


# । ऱ्हुमॅटॉलॉजी (संधिवाताचे शास्त्र) ।
# वेदना आणि आनंद !

**डॉ. श्रीकान्त वाघ**

ऱ्हुमॅटॉलॉजी हे खरे तर वेदनांचेच शास्त्र आहे. रोगालाच संस्कृतमध्ये दु:ख असेही म्हणतात. रोग हा शब्दही रुक् रुजा या मूळ संस्कृत शब्दापासून बनलेला आहे. सर्वच रोगांमध्ये दु:ख आणि वेदना असतेच, मग ते शारीरिक असो किंवा मानसिक. संधिवातासारख्या ऱ्हुमॅटॉलॉजीच्या आजारांमधील वेदना मात्र वेगळी असते. डायबेटिस, ब्लडप्रेशरसारख्या आजारात औषध कायम घ्यावे लागते. पण वेदना फारशी नसते. हार्ट ॲटॅक न्यूमोनिया, पोटातील अल्सर याची वेदना उपचारांमुळे थोड्याशा कालावधीनंतर थांबू शकते तर कॅन्सरची वेदना मृत्यूनंतर संपते. पण संधिवाताचे तसे नाही. औषधही चालू आणि वेदनाही चालूच. कधी कधी आयुष्य उद्ध्वस्त होण्याचीही पाळी येते. ही वेदना दूर करण्यासाठी वैद्यकशास्त्र निर्माण झाले. डॉक्टर हा मेडिसीन आणि पेशंट यांच्यातील एक दुवा बनून राहतो. ऱ्हुमॅटॉलॉजीची प्रॅक्टिस करताना ही जाणीव सतत होत रहाते. अनेक ठिकाणी फिरून थकलेला पेशंट अखेरचा उपाय म्हणून माझ्याकडे येतो. मी काही सांगेन ते तो तंतोतंत पाळतो आणि बरा होतो. त्याच्या समाधानात मग माझाही आनंद सामावून जातो.

ऱ्हुमॅटॉलॉजीची माझी पहिली केस आंध्र प्रदेशातील बिदरची. पस्तीस–चाळीस वर्षांच्या त्या बाईंचे एकूण एक सांधे संधिवाताने सुजले होते. हात–पाय हलवताही येत नव्हते. तिला स्ट्रेचरवरून आणून बेडवर झोपवली. तपासू देखील देईना. तपासायला हात लावला तरी विव्हळून ओरडे. तिची समजूत घालून थोड्याफार रक्ताच्या तपासण्या करून गोळ्या, औषध सुरू केले. त्यावर तिच्या मुलीने विचारले, ''डॉक्टर याचे काही साईड इफेक्ट्स आहेत का?'' त्या लोकांची मला बरीच समजूत घालावी लागली. संधिवाताच्या वेदना आणि सांधे कायमचे वाकडे होण्याचे भोग भोगण्यापेक्षा ज्यांचे दुष्परिणाम माहीत आहेत अशी औषधे घेण्यास काहीच हरकत नाही. औषधांच्या सुपरिणामांपेक्षा दुष्परिणाम जास्त असते, तर सरकारने ते औषध बाजारातही येऊ दिले नसते. शिवाय काही दुष्परिणाम झाले तर औषध आपल्याला बदलताही येऊ शकेल, असे मी तिला सांगितले. अखेर तिने ती औषधे घेण्याचे मान्य केले. तिला समजाविण्यात बराच वेळ गेला. ओपीडीत गर्दी तुंबून राहिली. तरीही दुसऱ्या दिवशी आज मला बरे वाटते आहे असे जेव्हा ती म्हणाली, तेव्हा फार आनंद झाला. हल्ली ती पेशंट तीन–तीन महिन्यांनी बिदरहून येते. तिचा कोणताही सांधा आता दुखत नाही. औषधेही मोजकीच घ्यावी लागतात. दरवेळी ती आणि तिची मुलगी माझ्या पायावर डोकं ठेवतात, अगदी लाजायला होते, पण समाधान वाटते हे मात्र खरे.

कर्मधर्म संयोगाने ऱ्हुमॅटॉलॉजीच्या पेशंटमध्ये स्त्रियांचेच प्रमाण जास्त आहे. त्यामुळे त्यांच्या स्वभावाची नानाविध रूपे प्रॅक्टिसमध्ये पहायला मिळतात. एक आजीबाई संधिवातातून अगदी छान सुधारल्या होत्या. रोज सकाळी मैत्रिणीबरोबर सारसबागेत तासभर राउंड मारायला लागल्या होत्या. त्यांना म्हैसूरला मुलीकडे जाण्याची इच्छा झाली. मीही परवानगी दिली. महिनाभर छान गेला. औषध कमी करावे म्हणून एकदा त्यांच्या मुलीचा फोन आला. पुढे पंधरा दिवसांनी त्यांना चिकुनगुन्या झाला. ह्याचा डास अगदी एका चाव्यातच पेशंटला अगदी पार वाकवून टाकतो. मूळचा संधिवात बळावलाय की, चिकुनगुन्याचा वेगळा संधिवात झाला याविषयी तिकडे संभ्रम निर्माण झाला. रोज सकाळ–

**डॉ. श्रीकान्त वाघ – ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट**
एम.बी.बी.एस. (मुंबई), एम.डी. (मेडिसिन), एम.एस्सी. ऱ्हुमॅटॉलॉजी (युके), बी.ए.एम.एस., एम.ए.एस्सी. (चिकित्सा), एम.ए. (संस्कृत) एम.ए. (संगीत)
**तेजस अपार्टमेंट्स, १०७८ शुक्रवार पेठ, टिळक रस्ता, हिराबाग, पुणे ४११ ००२.**
● फोन : (०२०) २४४७ ८९९३, ९७६३४ ०७२२९, ८४४६४ ०५०५०
● **Email :** sywagh@yahoo.co.in ● **Web :** www.arthritis-india.com ● **You Tube :** Dr. Shrikant Wagh

संध्याकाळ तिकडून फोन येऊ लागले. अखेर आठवडा-भरातच आजी पुन्हा बऱ्या झाल्या आणि फोनच्या जाचातून माझीही सुटका झाली. चिकुनगुन्याच्या काही पेशंटची सांधेदुखी महिनोन्महिने चालते. यावर ऱ्हुमॅटॉलॉजिस्टकडे काहीतरी औषध असेल म्हणून पेशंट मोठ्या अपेक्षेने येतात, त्यांना उत्तरे देताना अगदी नाकीनऊ येतात.

ब्लडप्रेशर, डायबेटिस, अल्सर, हार्टॲटॅक, कॅन्सर अशा नावांचा अर्थ पेशंटला लगेच कळतो. पण ऱ्हुमॅटॉलॉजीतल्या कधीही न ऐकलेल्या आजारांचे नाव सांगितले की पेशंट आणि त्यांचे नातेवाईक यांचे चेहरे प्रश्नार्थक होतात. बँकेच्या एका रिटायर्ड ऑफिसरचे दोन्ही घोटे अचानक सुजून दुखू लागले. मांड्यांवर लालसर फोड उठले आणि खोकला येऊ लागला. मी काही मोजक्या तपासण्या केल्या आणि तुम्हाला सारकॉइड झाला आहे असे सांगितले. त्यावर पेशंटच्या बायकोने जो आ वासला, तो मी कधीही विसरू शकणार नाही. कित्येक डॉक्टरांनासुद्धा जिथे सारकॉइड समजत नाही, तिथे पेशंटला काय समजणार? सुदैवाने तो चार आठवड्यातच बरा होतो. इन्शुरन्स कंपनीतील एका ऑफिसरला रशियाला दोन वर्षांकरिता जायचे होते. त्याला जेव्हा सारकॉइडचे निदान सांगितले, तेव्हा त्याने तिकडे दुर्लक्ष करून किती दिवसात बरा होईल असा एकच प्रश्न विचारला. पुढे रशियाहून त्याचा दर रविवारी सकाळी फोन येत असे. ऱ्हुमॅटॉलॉजीचा आपला पेशंट परदेशात आनंदात असल्याचे ऐकूनही मलाही मोठी मौज वाटे.

दुसऱ्या माझ्या एक पेशंटबाई ट्रीटमेंटने तीनएक महिन्यात अगदी छान बऱ्या झाल्या. त्या वर्षातून सहा महिने पुण्यातील मुलाकडे आणि उरलेले सहा महिने इंग्लंडच्या मुलाकडे असतात. त्या तिकडे गेल्या की, सांध्याचे फोटो आणि रक्ताचे रिपोर्ट अशी तीन महिन्यांनी मेल येते. मग दोन-चार दिवसांनी त्या बाईंचा फोन येतो. सगळे छान आहे, औषध सुरू ठेवा असे सांगितले की त्यांना समाधान वाटते. इंग्लंड, अमेरिकेत टेलिफोनवरील सल्ल्याचीही फी घेतात. आपल्याकडे ती पद्धत नाही. त्यामुळे पेशंट कसेही आणि केव्हाही फोन करत राहतात. असो, पेशंट बरा होण्याने आपल्यालाही बरे वाटते, तीच आपली फी.

एका इंजिनिअर मुलीला ऱ्हुमॅटॉइड आरथ्रायटिस झाला. दुखण्याने अगदी त्रासली होती. दुखण्याआधी कंपनीने तिला सिंगापूरला जायला सांगितले होते. पण तिने ते नाकारले. माझ्या औषधांनी तिला आठ-पंधरा दिवसातच बरं वाटायला लागलं. त्यावर ती पुन्हा सिंगापूरला जाण्याचा विचार करू लागली. औषधांच्या दुष्परिणामांचा अंदाज आल्याशिवाय २-३ महिने तरी बाहेर जाणे योग्य नाही असे मी तिला सुनावले. पहिली संधी गेली म्हणून तिलाही खूप वाईट वाटले. हल्लीच्या सॉफ्टवेअर इंजिनिअरला अशी विदेशवारीची पुष्कळ वेळा संधी मिळते. तरीही पहिलीच वेळ असल्यामुळे तिचे आकर्षण स्वाभाविक होते. तीन-एक आठवड्यात तिला औषधांचे कोणतेही साइड इफेक्टस् दिसत नव्हते. त्यामुळे माझ्या नकाराचे तिला आश्चर्य वाटले. पेशंटचा आपल्यावर विश्वास असला आणि आपणही ठामपणे सल्ला दिला की, पेशंट मुकाट्याने ऐकतात. सल्ला मात्र शास्त्रीय दृष्टीने योग्य पाहिजे. नाहीतर ते नेटवरून माहिती गोळा करून आपल्यासमोर टेबलावर ठेवतात. ऱ्हुमॅटॉलॉजीचा दिवसाकाठी एक तरी पेशंट मला रात्री उशीरा घरी गेल्यावर अभ्यास करायला लावतोच. अभ्यासाची मला हौस आहे हा भाग वेगळा.

अमेरिकेतील एका मुस्लिम इंजिनिअरला तिकडे ॲन्किलोजिंग स्पॉन्डिलायटिस (मणक्यांपाशी सूज येणारा संधिवात) झाला. कसेबसे ॲग्रीमेंट पुरे करून पुण्याला आला. वेबसाइटवर माझी माहिती घेऊन मला भेटला. त्याला तिकडे इन्फ्लिक्सिमॅब इंजेक्शनचा कोर्स करायला सांगितले होते. इंग्लंड-अमेरिकेतही जी औषधे महाग पडतात, ती आपल्याकडे काय परवडणार? त्याला वाटले की, भारतात ते औषध स्वस्त मिळेल. बहुराष्ट्रीय कंपन्या जगात सगळीकडे एकाच भावाने औषध विकतात. त्यामुळे तो हिरमुसला.अडुसष्ट हजाराचा एक डोस याप्रमाणे तीन डोस घ्यायचे होते. शेवटी कंपनीच्या लोकांना सांगून एक डोस त्याला फ्री मिळवून दिला. पहिल्या डोसमध्येच त्याच्यात कमालीची सुधारणा झाली. अगदी खाली वाकून जमिनीला हात टेकवू लागला. यावेळच्या कोर्सनंतर दोन-तीन महिन्यांनी पुन्हा कोर्स करायची वेळ येईल, तेव्हा हा काय करेल हा विचार मात्र पुढे बरेच दिवस माझ्या मनात घोळत राहिला.

बंगालच्या एका हायकोर्ट जज्ञांनी आपल्या मुलाला हौसेने एलएल.बी. ला घातले. पण दुसऱ्याच वर्षी स्पॉन्डिलायटिस झाला. एलएल.बी होईपर्यंत आजार इतका बळावला की, उभे राहून आर्ग्युमेंट करणे दूरच, पण साधे

फिरण्यासाठीही व्हिलचेअर लागे. तोपर्यंत जज्ञसाहेब रिटायर झाले. रिटायरमेंटच्या रकमेतील चार-पाच लाख इन्फ्लिक्सिमॅब औषधामध्ये घातले. पण काही उपयोग झाला नाही. मी नेहमी जे पेशंट पाहतो त्यांना ही असली औषधे परवडणे शक्य नाही. त्यांच्यासाठी मी वेगळी औषधे वापरतो. पण बरेचसे पेशंट सुधारतात. हृदयरोगाच्या ॲन्जिओप्लास्टीमध्ये लोक लाख-लाख रुपये उभे करून खर्च करतात. पण आमच्या संधिवातासाठी महिन्याला हजार-पंधराशे रुपयेही खर्च करायला बहुतेक पेशंटच्या अगदी जीवावर येत असते. असो. याच आजाराच्या एका कोकणातील विकलांग पेशंटसाठी तळमळीने धडपडणारा एक भाऊ मी पाहिला. त्यांची मी कधीही फी घेतली नाही.

संधिवात हा आजार नसून एक लक्षण आहे. असे जवळजवळ शंभर एक प्रकार असतात. त्यामुळे सांधेदुखीचा प्रत्येक पेशंट तपासताना सतर्क रहावे लागते. त्यासाठी वेळ द्यावा लागतो. वाचत राहावे लागते. नगर जिल्ह्यातील तालुक्याचा एक राजकारणी कडक इस्त्रीचे पांढरे शुभ्र कपडे घालून माझ्याकडे आला. तिकडे त्याची चार महिने संधिवाताची ट्रीटमेंट चालू होती. दोन्ही मनगटे आणि बोटांचे सांधे सुजले होते. काही तपासण्या करून संध्याकाळी मी जेव्हा महारोग (लेप्रसी) असे निदान केले, तेव्हा तो कोसळलाच. अवघे राजकीय भवितव्य अंधाराचे झाले. दुर्दैवाने त्याच्या हाताच्या बोटांमधली गेलेली ताकद मी परत आणू शकत नव्हतो. निदान बोटे झडणार नाहीत एवढेच काय ते समाधान. हाच पेशंट आधी माझ्याकडे आला असता, तर ही वेळ आलीच नसती. असो. प्रारब्ध टळत नाही हेच खरे.

काही रुग्णांची दुखणी पूर्णपणे मानसिकच असतात. त्यांचे काहीतरी दुखणे सतत चालू असते. त्याला फायब्रोमायाल्जिया म्हणतात. डॉक्टरही अदलून बदलून औषधे देत रहातात. गुण कशानेच येत नाही. मग पेशंटही डॉक्टर बदलत राहतात. त्यांच्या ट्रीटमेंटमध्ये मानसरोगतज्ज्ञ लागतात. त्यांना वेळही द्यावा लागतो. अशा आजारांसाठी मी मेडिकल असोसिएशनमध्ये काही वर्षांपूर्वी पुन्हा सायकियाट्रीचा कोर्स केला.

वयस्कर लोकांना होणारा गुडघ्याचा संधिवात हाही असाच आजार आहे. खरेतर त्यावर कोणतेही औषध नाही. औषध वापरताना त्या वयात साईड इफेक्ट्सवर फार लक्ष ठेवावे लागते. वजन कमी करा, जीवनशैलीत बदल करा अशा गोष्टी सांगायला सोप्या असल्या तरी अंमलात आणणे कठीणच. संडासला कमोड वापरा म्हटले की, बहुतेक सर्व भारतीयांचा चेहरा कसानुसा होतो. मांडी घालू नका म्हटले की, आजोबांची देवपूजेची आणि आजींची विळीवर भाजी चिरण्याची पंचाईत होते. एका आजोबांना पाटावर मांडी घालून बसून जेवल्याशिवाय पोट भरल्यासारखे वाटत नाही. शेतकऱ्यांचे तर विचारूच नका. सांधा बदलणे ही पुन्हा लाखाची गोष्ट. तेवढे आर्थिक पाठबळ बहुतेकांना नसते. ऑपरेशन बिघडले तर पूर्ण वाट लागते आणि यशस्वी झाले तर मांडी घालण्याची खात्री नाही. संडासमध्ये दोन पायांवर बसण्याची तर नाहीच नाही. या ऑस्टिओ-आरथ्रायटिसची ट्रीटमेंट म्हणजे भिंतीवर डोके आपटत राहिल्यासारखे वाटत राहते.

सिस्टेमिस लुपसच्या पेशंटची व्यथा सांगितल्याशिवाय ऱ्हुमॅटॉलॉजीची कथा संपू शकत नाही. लुपस म्हणजे लॅटिन भाषेत लांडगा. लांडग्यासारखा लबाडीने नकळत हा आजार पेशंटचे आयुष्य खात असतो. कधी त्वरेचर पुरळ, कधी तोंडात फोड, कधी छातीत पाणी, कधी फीट येऊन बेशुद्ध तर कधी किडनी निकामी. सुरूवातीला हा आजार कोणाच्याच लक्षात येत नाही. समजल्यावरही योग्य ट्रीटमेंट करण्याचा साधारण डॉक्टरांना अनुभव नसतो. वारंवार उद्भवणारे नवनवे त्रास, तपासण्या आणि औषधांचे खर्च, बरे होण्याविषयी शंका यामुळे पेशंट आणि त्यांचे नातेवाईक अगदी खचून जातात.

एका बायोटेक्नॉलॉजीच्या लेक्चरर मुलीचे लग्नानंतर चार-पाच महिन्यातच ॲबॉर्शन झाले. त्यानंतर हातापायाच्या बोटांना काळसरपणा येऊन जखमा झाल्या. तेव्हा लुपसचे निदान झाले. तिचा इंजिनिअर नवरा परगावी चांगल्या नोकरीत होता. ती त्याने सोडली आणि माझ्या ट्रीटमेंटसाठी पुण्यात येऊन राहिला. दुसऱ्या एका लुपसच्या मुलीच्या किडनी खराब झाल्या. तिला मधूनमधून थकवा वाटे, तर कधी फार निराशा वाटे. शेवटी तिने नोकरी सोडली. या दोन्हीही पेशंटचे नातेवाईक त्यांना फार आधार देतात. परदेशात लुपसच्या पेशंटसाठी आधारगट असतात. त्यांचा फार उपयोग होतो. आजारही महाकठीण. ग्रीक पुराणातील हायड्रा नावाच्या राक्षसाची उपमा त्याला देतात. त्याला अनेक डोकी असतात आणि त्यातील एखादे उडवले तरी तेथे आणखी तीन-चार डोकी उगवतात. लुपस म्हणजे आपल्याकडचा रावणच. त्याला आटोक्यात आणण्यासाठी

ऱ्हुमॅटॉलॉजिस्टचा रामबाणच पाहिजे.

वीसएक वर्षांच्या मेडिकल प्रॅक्टिसनंतर माझे गुरु मुंबईचे डॉ. व्ही.आर. जोशी यांच्या प्रेरणेने मी ऱ्हुमॅटॉलॉजी शिकलो. घरातील साऱ्यांची मदत झाली. पुण्याच्या डॉ. के.एच. संचेती यांच्या प्रोत्साहनाने पुन्हा नव्याने प्रॅक्टीस करू लागलो. नवीन महागडी औषधे आपल्याकडे परवडू शकत नाहीत, पण आहेत त्या औषधांचा योग्य पद्धतीने वापर केला की, बहुतेक पेशंट सुधारतात. पेशंटची समजूत काढावी लागते. वेदना सहन करायला शिकवावे लागते. आजाराबरोबर जगण्याची मानसिकता तयार करावी लागते. प्रत्येक पेशंटची समस्या वेगवेगळी असली तरी कौन्सेलिंग (समुपदेशन) एकसारखेच असते. त्यामुळे दिवसाच्या शेवटी अगदी थकायला होते.

तरीही व्हिलचेअरवरून आणलेला तरुण पुढच्या खेपेला खाली वाकून बुटाचे बंद सोडून पायऱ्या चढून तपासणीच्या टेबलावर झोपतो हे पाहून जे समाधान वाटते ते शब्दात वर्णन करणे शक्य नाही. ऱ्हुमॅटॉलॉजीमुळे वर्षभरातच कॉन्फरन्सच्या निमित्ताने देशविदेशातील डॉक्टरांच्या ओळखी झाल्या. नवेनवे स्पेशालिस्ट डॉक्टर पेशंट पाठवू लागले. पूर्वी कधी पाहिले नाही असे आजार पाहू लागलो. गावोगावांहून पेशंट येऊ लागले. औषधांच्या कंपन्या संपर्कात येऊ लागल्या. विदेशवाऱ्यांचे योग आले. लेख छापून येऊ लागले. ठिकठिकाणी भाषणे होऊ लागली. एकूणच काम खूप वाढले. त्यामुळे कधी गाण्याचा रियाज राहून जाते. कधी योगासने आणि व्यायामाला वेळ मिळत नाही, तर कधी घराकडे, आई, बायको, मुलांकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत वाटते.

दुर्दैवाने ऱ्हुमॅटॉलॉजी या स्पेशालिटीविषयी लोकांमध्ये माहिती नाही. त्यासाठी महिन्यातून दोन वेळा मोफत शिबिरे असतात. साऱ्यांच्या ऋणातून उतराई होण्याचा तेवढाच काय तो प्रयत्न !

❖ ❖ ❖

**दिल्लीच्या पालम विमानतळावर पूर्ण केलेला लेख**
**सौजन्य : पीएचआरसी बुलेटिन २००७**